माध्यमादित्य

# रंग माझा वेगळा...

एका उपग्रह वाहिनीच्या प्रशस्त (खरं तर 'हायफाय' असंच म्हणायला हवं) कार्यालयात 'प्रभात'च्या कुंकू, शेजारी, माणूस, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर अशा चक्क कृष्णधवल चित्रपटाच्या डीव्हीडींचा संग्रह जपून ठेवला जातो, अधूनमधून त्यांच्या क्रिएटिव्ह फिल्डसाठी त्याचे 'शो' आयोजिले जातात, त्यावर चर्चा होते, त्या चित्रपटातील स्पेशल इफेक्टसवर विचार केला जातो, त्यातून काही शिकता येईल का हेदेखील पाहिले जाते. हे सगळंच आश्चर्यकारक आहे ना? एव्हाना चित्रपटसृष्टीच्या इतिहासावर प्रेम करणारं 'मराठी मन' सुखावलंदेखील असेल. पण ही वस्तुस्थिती आहे. 'कलर्स' या अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या वाहिनीच्या अंधेरीच्या कार्यालयात 'प्रभात'च्या या चित्रपटांचा खास आस्वाद घेतला जातो. यामागचे एक कारण म्हणजे या वाहिनीची सीनियर व्हाईस प्रेसिडेन्ट (हेड-क्रिएटिव्ह व कन्टेंट) अश्विनी यार्दी ही एक 'मराठी मुलगी'. ती मूळची अश्विनी पै! 'प्रभात'चे बाबुराव पै यांची ती नात.

'कलर्स' वाहिनीची वाटचाल वादळी पध्दतीने सुरू आहे. परंतु, अश्विनी प्रभातच्या चित्रपटांचा आशय व मूल्य या गोष्टी विसरलेली नाही. इतकंच नव्हे, तर आजचं 'वाहिन्यांचं जग' कमालीचं कॉस्मॉपॉलिटन असलं तरी अश्विनी यार्दी शुद्ध व चांगले मराठी बोलतात. १९९३ साली सेंट झेवियर्समधून 'ॲडव्हर्टायझिंग व कम्युनिकेशन' या विषयात पदवी प्राप्त केल्यावर पुढच्याच वर्षी त्या झी टी.व्ही. मध्ये दाखल झाल्या. तेव्हा उपग्रह वाहिन्यांचे आपल्या देशात नुकतेच आगमन झाले होते. वाहिन्यांच्या जगात फारशी स्पर्धादेखील नव्हती. पण काही चांगले कार्यक्रम साकारून स्वतःला सिद्ध करावं, त्यातून आनंद मिळवावा व त्याच वेळी वाहिनीदेखील लोकप्रिय करावी, असा मात्र अनेकांचा स्वच्छ हेतू होता. अश्विनी यार्दी यांनी ती स्थिती खूप एन्जॉय केली. प्रोग्रॅमिंग हेडची जबाबदारी त्यांनी कल्पकतेने पार पाडली. सात फेरे, दुल्हन, सारेगामा चॅलेन्ज, सारेगामा लिटिल चॅम्पस हे त्यांचे उल्लेखनीय कार्यक्रम होत.

कार्यक्रमांच्या वाढत्या लोकप्रियतेने कामाचा उत्साह वाढतो व सतत आणखी काही करावेसे वाटते, अशी कल्पना यार्दी यांची भावना आहे. त्यातूनच त्यांनी आणखी एक विलक्षण भरारी घेतली. वॉर्नर ब्रदर्स, सोनी पिक्चर्स, युनिव्हर्सल स्टुडिओ, पॅरामाऊंट स्टुडिओ अशा आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी 'यशस्वी संपर्क' साधत 'झी' साठी फ्रेन्डस, द सोप्रान्स ॲण्ड सेनेफेल्ड असं कार्यक्रम मिळवले.

त्यांच्या घडणीच्या काळात त्यांनी 'फिलिप्स टॉप टेन' व 'एक्स क्या सीन है' या कार्यक्रमाच्या वेळी कुणाल कोहलीकडे असिस्टंट दिग्दर्शिका म्हणून खूप उपयुक्त अनुभव घेतला. सतत नवे काही शिकत राहण्याच्या प्रवृत्तीतून वाढणारा आत्मविश्वास त्यांना खूप मोलाचा वाटतो. त्यातून मग त्यांनी 'डाक घर', 'रसना साँग तेरे नामसे' यांचेही दिग्दर्शन केले. या वाटचालीत त्यांच्याकडे मग झी इंग्लिश व झी एमजीएम या वाहिन्यांच्या प्रमुखपदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

साधारण २००२-०३ चा तो काळ होता. एव्हाना उपग्रह वाहिन्यांची संख्या बरीच वाढली. त्यांच्यात कमालीची स्पर्धा सुरू झाली. त्यातून प्रत्येक वाहिनी आपला 'स्वतःचा चेहरा व अस्तित्व' शोधू लागली. प्रेक्षकांना आकर्षित करतील अशा कार्यक्रमांची गरज सतत भासू लागली. अनुभवी व इच्छुकांना नव्या वाहिन्यांतून कर्तबगारीच्या नव्या संधी मिळू लागल्या. अश्विनी यार्दी 'कलर्स'कडे आल्या.

'कलर्स'ची सुरुवात खूपच कलरफुल, आकर्षक व बहुचर्चित झाली. 'हो, पण ते सगळं एका दिवसात घडलेले नाही, त्याच्या तयारीसाठी जवळपास दीड वर्षाचा कालावधी दिला गेला, तेव्हा असा रिझल्ट देणे शक्य झाले,' अश्विनी यार्दी अतिशय शांतपणे सांगतात. फिअर फॅक्टर, बिग बॉस, एक हसिना एक खिलाडी, बालिका बधू अशा एकेका 'लक्ष्यवेधी व रोमहर्षक' मालिकांनी प्रेक्षकांना 'कलर्स'ने खूपच वेगाने आकर्षित करून अल्पावधीतच 'तिसरा क्रमांक' पटकावलाय. यावर अश्विनी यार्दी म्हणतात, ''अं... हं... तिसरा नाही, दुसरा... आजच ताजी टीआरपी आली असून आम्ही आणखी एक पायरी वर चढलोय. पण पहिल्या क्रमांकापासून आम्ही फार दूर आहोत असेही नाही.''

आज प्रत्येक वाहिनी दुसऱ्यापेक्षा वेगळे व दर्जेदार देता कसे येईल, याचा सतत विचार करतेय; असे त्या सांगतात. त्यांच्या वाहिनीकडून पुढचा धक्का कोणता मिळणार, हे मात्र त्या उघड करीत नाहीत.

काही गोष्टी सांगत त्या उत्सुकता वाढवत नेतात. चाकोरीबाह्य असे काही कार्यक्रम 'कलर्स'वर येणार आहेत, असं त्या सूचित करतात.

'धाडसी म्हणजे सध्या 'बिग बॉस'मध्ये जे दाखवले गेले तसे काही नाही ना?' या प्रश्नावर अश्विनी यार्दी पटकन सावध पवित्रा घेतात. मोर्चे-निदर्शने याचा मुद्दा न वाढवता त्या म्हणतात, ''आमच्या हाती येणाऱ्या चित्रीकरणात याहीपेक्षा 'बोल्ड व आक्षेपार्ह दृश्ये' असतात, पण आम्ही सेन्सॉर बोर्डाने आखून दिलेल्या नियमांचे योग्य ते व व्यवस्थित पालन करूनच ते प्रक्षेपण करतो आहोत.''

'बिग बॉस'पेक्षा 'बालिका वधु'वर भाष्य करण्यास त्या इच्छुक दिसतात. त्या मालिकेच्या लोकप्रियतेने 'कलर्स'ला प्रतिष्ठा लाभलीय, याचा अभिमान त्यांच्या बोलण्यात येतो.

'बऱ्याच वाहिन्यांवर महत्त्वाच्या पदावर सध्या स्त्रीयाच आहेत, हे योगायोगाने झाले की...' असे विचारताच त्या फक्त हसतात. स्त्री अथवा पुरुष असा भेदभाव करण्याची गरज नाही असेच त्या सूचित करतात. चांगली स्पर्धक कोण वाटते, या प्रश्नावर त्या पटकन 'एनडीटीव्ही इमॅजिन'च्या शैलजा केजरीवाल यांचे नाव घेतात.

'सात फेरे', 'बालिका वधु' यांचा लेखक पुणेन्द्रू शेखर, स्टार प्लसचा कार्यक्रमप्रमुख विवेक बहेल, अभिनेत्री सृष्टी आर्य, फराह खान व साजिद खान हे त्यांचे खास मित्रगण. पती सचिन यार्दी हादेखील त्यांचा खूप चांगला मित्र आहे. 'ट्रॅफिक सिग्नल', 'क्या कुल है हम' याचं लेखन व 'सी कंपनी' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाचा अनुभव असणाऱ्या सचिनला मात्र 'कलर्स' वाहिनी फारशी आवडत नाही. तो त्यातले काही दोष काढतो. यावरून पती-पत्नीमध्ये वाददेखील होतात, पण ते वाद खेळकर-खोडकर असतात.



बिझी शेड्युलमधून रिकामा वेळ कधी व कसा मिळतो? वीकेण्डला त्या त्यांच्या चार वर्षाच्या मुलामध्ये छान रमतात. त्यांच्यातील आईच्या भूमिकेला न्याय देतात. किचनमध्ये जाण्याचा योग त्यांना फारसा येत नाही, पण आलाच तर चिकनचे विविध प्रकार त्या आवडीने करतात. पेंटिंग्ज बनवणे व घरसजावट या त्यांच्या अत्यंत आवडत्या गोष्टी आहेत. पूर्वी त्यासाठी भरपूर वेळ मिळायचा, आता मात्र वेळ काढावा लागतो.

एकीकडे खासगी आयुष्य जपतानाच व्यावसायिक आयुष्यात त्यांनी निर्मिती-दिग्दर्शन- कार्यक्रमप्रमुख याबरोबरच व्यावसायिक विस्तार वगैरे जबाबदाऱ्या व्यवस्थित पेलल्या आहेत. भानावर असणारी माणसंच कल्पकतेला उत्साहाची जोड देऊन अशी मजल मारतात... पुढची लक्षवेधी पावले टाकतात.

॥■ किशोर धारगळकर